दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २२२) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.०३ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## मराठा समाजासाठी आजपासूनच हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र वाटप-प्रसाद लाड

### पाणी पिऊन सलाईन घेण्यास होकार, मात्र आंदोलन सुरुच ठेवणार-जरांगे



जालना दि.२ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली असून, 'रद्द झालेली चार प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय उपोषण सोडणार नाही,' असा इशारा सरकारला दिला. सध्या फक्त पाणी पिऊन आणि सलाईन लावून आंदोलन सुरू ठेवणार असून सरकारला ४ दिवसांची मुदत दिली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रसाद लाड साहेब खूप तळमळ करत आहेत, पण आपले आरक्षण फक्त 'श्रेयात' गुंतले आहे. त्यामुळे आपल्याला आता वेगळी आणि कठोर लढाई करावी लागेल, असे ते म्हणाले.

मराठा समाजाच्या सर्व मागण्या या मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या म्हणजे १७ सप्टेंबरच्या आधी पूर्ण करू, मराठ्यांना ओबीसींच्या सर्व सवलती देऊ, असा मोठा शब्द राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून आमदार प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे यांना दिला. उद्यापासून (३ सप्टेंबर) हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्राचं वाटप सुरू होईल, असंही ते म्हणाले.

यावेळी जरांगे पाटील म्हणाले, आम्हाला ओबीसींचे १ टक्का आरक्षण नको आहे. ज्यांच्या नोंदी निघत आहेत, त्यांना प्रमाणपत्र मिळालेच पाहिजे आणि याला ओबीसींचा देखील विरोध नसला पाहिजे. उद्या जर हैदराबाद गझेटियरनुसार कुणबी प्रमाणपत्र वाटप झाले तर आम्ही फुले उधळू. सातारा आणि कोल्हापूर गझेटियरनुसार सरकारने तात्काळ जीआर काढावा आणि त्याची अंमलबजावणी ३ महिन्यांनंतर करावी. चार रद्द झालेले प्रमाणपत्र दिल्याशिवाय उपोषण सोडणार नाही. राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर टीका करताना जरांगे म्हणाले की, 'विखे पाटील कधीच खरे बोलत नाहीत, ते काहीतरी शाळा करत आहेत आणि शिंदे-फडणवीस यांच्यात भांडण लावत आहेत. आमचे त्यांच्याशी वैयक्तिक शत्रूत्व नाही, पण ते नेहमी खोटे बोलतात.'

प्रसाद लाड यांना म्हणाले की, 'मी फक्त तुमच्या शब्दाचा मान ठेवून उठून बसलो आहे, नाहीतर मंत्री आले तरी मी मोजत नाही,' असे सांगत जरांगे यांनी मुंबईत येऊन बाकीच्या गोष्टी नीट करण्याचा इशारा दिला. चार दिवसांची वेळ देऊन पाणी पिणे व (पान ४ वर)

### आमदार प्रसाद लाड यांनी दिलेली प्रमुख आश्वासने

* उद्या दुपारी १२ वाजल्यापासून हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्र वाटपाची प्रक्रिया अधिकृतपणे सुरू करण्यात येईल.
* ज्या चार विद्यार्थ्यांची कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली होती, त्याप्रकरणी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना तात्काळ सूचना देण्यात आल्या असून विद्यार्थ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जात आहे.
* मराठा आरक्षणाच्या लढ्यादरम्यान दाखल झालेल्या एकूण १३७६ गुन्ह्यांपैकी बहुतांश गुन्हे मागे घेण्यात आले असून उर्वरित राहिलेले गुन्हे तांत्रिक व कायदेशीर चौकटीत कसे मागे घेता येतील, याची पडताळणी सुरू आहे.
* गेल्या आठवड्यात झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार, मराठा आरक्षणाच्या समितीसाठी १२५० स्क्वेअर फुटाचे स्वतंत्र कार्यालय उपलब्ध करून दिले जात आहे.
* मराठा समाजाला यापूर्वी आपल्या न्याय्य हक्कांसाठी केवळ सामाजिक न्याय विभागावर अवलंबून राहावे लागत होते. यापुढे थेट मंत्रालयाशी समन्वय साधून मराठ्यांचे सर्व प्रश्न वेगाने सोडवले जातील.
* जात पडताळणी समिती आणि वंशावळी शोधणाऱ्या न्यायमूर्ती शिंदे समितीला पुन्हा एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येणार आहे. तसेच या समितीच्या कामकाजासाठी मुंबईत ३ हजार स्क्वेअर फुटांची जागा दिली जाईल.
* इतर मागासवर्गीय समाजाला मिळणाऱ्या सर्व शैक्षणिक व आर्थिक सवलती मराठा समाजालाही पूर्णपणे लागू करण्यात येतील.
* आरक्षणाचा अंतिम निर्णय लागत नाही, तोपर्यंत कोणत्याही मराठा विद्यार्थ्याचा शैक्षणिक प्रवेश रद्द केला जाणार नाही. तसेच त्यांच्या शैक्षणिक शुल्काचा (फी) भार राज्य सरकार उचलणार आहे.
* अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळासाठी उर्वरित ३०० कोटी रुपयांचा निधी तात्काळ वितरित केला जात असून, यापुढे या महामंडळाला कोणत्याही प्रकारची आर्थिक कमतरता भासू दिली जाणार नाही.

## शिवसेना प्रकरणात निवडणूक आयोगाचा निर्णय अधिकारानुसार योग्यच

### एकनाथ शिंदे यांचे वकील नीरज किशन कौल यांचा सर्वोच्च न्यायालयात युक्तीवाद

नवी दिल्ली दि.२ (वृत्तसंस्था)- शिवसेना प्रकरणात निवडणूक आयोगाने जो निर्णय दिला तो योग्यच असून निवडणूक आयोगाला तसा अधिकार आहे, असा जोरदार युक्तिवाद एकनाथ शिंदे यांचे वकील नीरज किशन कौल यांनी केला. बाळासाहेब ठाकरे हयात असतानाही निवडणूक आयोगाने हा अधिकार वापरला होता, असा दावाही कौल यांनी केला. उद्धव ठाकरे यांनी पक्षातील लोकशाही संपवून सर्व अधिकार स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न केला, त्यानंतर पक्षात असंतोष निर्माण झाला, असं कौल यांनी न्यायालयात सांगितलं.

बाळासाहेब ठाकरे यांनी निवडणूक आयोगाचे अधिकार मान्य केले होते. १९९९ सालची घटना निवडणूक आयोगासमोर आणल्यानंतर निवडणूक आयोगाने त्यामध्ये काही बदल करण्याच्या सूचना केल्या होत्या. ते मान्य करत बाळासाहेब ठाकरे यांनी निवडणूक आयोगाचे अधिकार मान्य केले होते, असा युक्तिवाद एकनाथ शिंदे यांच्या वकिलांनी केला. २०१८ साली उद्धव ठाकरे यांनी त्या घटनेमध्ये बदल केला, जो अवैध होता, असाही युक्तिवाद त्यांनी केला.

पक्षघटना योग्य आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार हा निवडणूक आयोगाला आहे. त्यामुळेच त्यांनी २०१८ सालची घटना ही योग्य नव्हती असा निर्णय दिला, असा दावा एकनाथ शिंदे यांच्या वकिलांनी केला. शिवसेनेच्या विचारांच्या विरोधात असलेल्या पक्षाशी युती करण्याचा निर्णय उद्धव ठाकरे यांनी घेतला होता. त्यामुळे पक्षात एक प्रकारचा असंतोष निर्माण झाला होता, असा दावा शिंदेंच्या वकिलांनी केला. त्याआधारेच एकनाथ शिंदे यांनी आपलाच पक्ष मूळ शिवसेना असल्याचा दावा केल्याचं वकिलांनी सांगितलं.

राजकीय पक्ष कोणता आहे हे ठरवताना विधिमंडळातील आमदारांची संख्या पाहणे गरजेचं आहे असं या आधी सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं आहे. त्यामुळेच शिवसेनेच्या प्रकरणात विधिमंडळातील आमदारांची संख्या निवडणूक आयोगाने लक्षात घेतली, असा युक्तिवाद शिंदेंच्या वकिलांनी केला.

### बाळासाहेबांनंतर पक्षात निवडणुका होत नव्हत्या, मनमानी होत होती-एकनाथ शिंदे

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हासंदर्भातील प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटावर जोरदार निशाणा साधला आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर शिवसेनेत लोकशाही पद्धतीने निवडणुका होत नव्हत्या, तर पक्षात मनमानी कारभार सुरू होता, असा गंभीर आरोप शिंदे यांनी केला. बाळासाहेबांचे विचार, हिंदुत्व आणि पक्षाची मूळ भूमिका बदलण्यात आली, असा दावा करत त्यांनी, ''खरी शिवसेना आम्हीच आहोत,'' असा पुनरुच्चार केला.

दिल्ली येथे शिवसेनेच्या विविध राज्यांतील प्रमुखांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. संघटनात्मक बांधणी, आगामी निवडणुका, एनडीएमधील भूमिका आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांबाबत या बैठकीत चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

''मी दिल्लीला आल्यानंतर राज्यप्रमुखांची बैठक घेत असतो. अनेक दिवसांपासून राज्यप्रमुखांचीही बैठक व्हावी आणि विविध विषयांवर चर्चा व्हावी, अशी मागणी होती. त्यानुसार ही बैठक घेण्यात आली,'' असे शिंदे म्हणाले.

## एमपीएससी पेपरफुटीप्रकरण, ऋतुजा पाटील कोर्टात भावूक; अधिकाऱ्याने लॅपटॉप खाडीत टाकला, पोलिसांच्या तपासातून पुढे

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- नीट पेपरफुटीनंतर राज्यभरात गाजलेल्या एमपीएससी परीक्षेच्या पेपरफुटीवरुन आता कारवाईला वेग आला आहे. याप्रकरणी गुन्हे शाखेने अगोदरच तीन अधिकाऱ्यांसह ७ जणांना अटक केली होती. त्यानंतर, एमपीएससी औषध निरीक्षक पेपरफुटी प्रकरणी नंदुरबार येथून ऋतुजा पाटीलला देखील अटक करण्यात आली. पोलिसांनी नंदुरबारमध्ये ऋतुजाला ताब्यात घेऊन चौकशी केल्यानंतर तिला अटक करण्यात आली. त्यानंतर, आज न्यायालयात हजर केले असता ऋतुजाला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर, उर्वरित आरोपींना पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

एमपीएससी औषध निरीक्षक पेपरफुटी प्रकरणी अटक करण्यात आलेल्या सर्वच सात आरोपींना सत्र न्यायालयात हजर करण्यात आलं. यावेळी, सात दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी पोलिसांकडून करण्यात आली होती. तर, पोलिसांनी अटक केल्यानंतर ऋतुजा पाटीलला आज न्यायालयात हजर केले असता ऋतुजा कोर्टात भाऊक झाल्याचं दिसून आलं. याप्रकरणातील आरोपी असलेला एमपीएससीचा अधिकारी विश्वेशर नकाते याने गुन्ह्यात वापरलेला लॅपटॉप खाडीत फेकला होता. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने आरोपीने लॅपटॉप खाडीत फेकल्याची माहिती तपासातून समोर आली आहे. याच लॅपटॉपवर नकातेने सगळे २९४ प्रश्न आणि त्यांच्या पर्यायाची नोंद केली असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

पोलिसानी खाडीत फेकलेला हा लॅपटॉप शोधला आणि त्यातील डाटा रिकव्हर करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती आज कोर्टात दिली. नंदुरबारमधील कौटिल्या क्लासेसचा संचालक आणि आरोपी प्रवीण पाटीलच्या घरातून आर्थिक नोंदीचे दस्तावेजही सापडले आहेत. मात्र, अद्यापही काही तपास बाकी असल्याने पोलिसांनी आरोपींच्या ७ दिवस पोलीस कोठडीची मागणी केली होती. तपास प्रगतीथावर असून आरोपी आणि ऋतुजा पाटीलची समोरासमोर चौकशी करणे गरजेचे असल्याचे मत पोलिसांचे आहे. आरोपी तपासात सहकार्य करत नाहीत, उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचेही पोलिसांनी कोर्टात सांगितले. त्यानंतर, न्यायालयाने आरोपी ऋतुजाला ३ दिवसांची तर उर्वरीत आरोपींना ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

## सीबीआय अधिकारी नियुक्त करा, गुन्हा दाखल करा; दिशा सालियन प्रकरणी उच्च न्यायालयाचे आदेश

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- मनोरंजनविश्वापासून अगदी राजकीय वर्तुळात खळबळ माजवणारं दिवंगत सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन मृत्यू प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयानं निकाल दिलाय. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानं सीबीआय अधिकारी नियुक्तीचे आदेश दिले आहेत. तसेच, या प्रकरणी बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे आदेशही मुंबई उच्च न्यायालयानं दिले आहेत.

मुंबई उच्च न्यायालयानं दिशा सालियन मृत्यू प्रकरणात महत्त्वपूर्ण निकाल देत या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, दिवंगत बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंह राजपूतची मॅनेजर असलेल्या दिशा सालियन हिच्या मृत्यूबाबत न्यायालयानं निकाल जाहीर केला. या प्रकरणातील सुनावणी पूर्ण झालेली आणि मागील सुनावणीदरम्यान न्यायालयाकडून निकाल राखून ठेवण्यात आला होता. न्यायालयानं पोलिसांना या प्रकरणात एफआयआर नोंदवण्याचे निर्देशही दिले आहेत. न्यायालयानं सुनावलेला निकाल दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी दाखल केलेल्या याचिकेशी संबंधित आहे. त्यांनी एफआयआर नोंदवून नव्यानं तपास केला जावा, आणि विशेषतः हा तपास सीबीआयमार्फत केला जावा, अशी मागणी करत उच्च न्यायालयात धाव घेतली होती. यापूर्वी, २८ ऑगस्ट रोजी मुंबई उच्च न्यायालयात या प्रकरणावरील सुनावणी पूर्ण झाली होती आणि न्यायालयानं एफआयआर नोंदवण्याच्या मागणीबाबत सतीश सालियन यांच्या याचिकेवरील आपला निर्णय राखून ठेवला होता.

## महागाई वाढल्याने सुप्रिया सुळेंची केंद्र आणि राज्य सरकारच्या आर्थिक धोरणावर टीका

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- वाढत्या महागाईच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात आंदोलन करत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या आंदोलनात खासदार सुप्रिया सुळे सहभागी झाल्या. यावेळी त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या आर्थिक धोरणांवर जोरदार टीका करत ''घरात जाऊन तुमच्या आई, बहीण आणि पत्नीला विचारा, किती महागाई झाली आहे,'' अशा शब्दांत सरकारला सुनावले. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडले असून, सरकारने महागाई कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सुळे यांनी केली. भाज्या, धान्य, दूध, साखर यांसारख्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या वाढलेल्या दरांचा फटका सामान्य नागरिकांना बसत असल्याचे त्यांनी सांगितले.

सीएसएमटी परिसरात झालेल्या आंदोलनात पक्षाचे मुंबईतील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यकर्त्यांनी 'महागाई की मार नहीं चलेगी' अशा घोषणा देत सरकारचा निषेध केला. आंदोलनात काही कार्यकर्त्यांनी भाज्या आणि धान्यांचे हार गळ्यात घालून वाढत्या महागाईकडे लक्ष वेधले. महागाईवर बोलताना सुप्रिया सुळे यांनी सरकारी आकडेवारी आणि प्रत्यक्ष घरगुती खर्चातील फरकावर प्रश्न उपस्थित केला. ''फूड इन्फ्लेशन किती आहे, हा प्रश्नच आहे. तुम्ही घरी जाऊन तुमच्या आई, बहीण किंवा पत्नीला विचारा, किती महागाई झाली आहे. घरातील खर्च कसा भागवायचा, हा प्रश्न आज प्रत्येक कुटुंबासमोर आहे,'' असे सुळे म्हणाल्या. त्यांनी दूध, धान्य, भाज्या, कांदा, साखर यांसारख्या वस्तूंच्या किमतींचा उल्लेख करत सामान्य नागरिकांच्या अडचणींकडे सरकारचे लक्ष वेधले. सकाळच्या नाश्त्यापासून ते घरातील रोजच्या स्वयंपाकापर्यंत महागाईचा परिणाम जाणवत असल्याचा दावा त्यांनी केला. ''दूध हा मूलभूत पदार्थ आहे. सकाळची सुरुवातच दुधापासून होते. मात्र, त्याचे दरही वाढले आहेत. सामान्य माणसाचे कंबरडे मोडण्याचे काम सरकार करत आहे,'' असा आरोप त्यांनी केला.

## पावसासाठी क्लाऊड सीडिंगचा प्रयोग करा; धीरज देशमुख यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

लातूर दि.२ (प्रतिनिधी)- मराठवाड्यात पावसाने पुन्हा पाठ फिरवल्याने खरीप पिकांवर संकट निर्माण झाले असून शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते धीरज देशमुख यांनी राज्य सरकारने केवळ पावसाची प्रतीक्षा न करता उपलब्ध वैज्ञानिक आणि तांत्रिक पर्यायांचा वापर करण्याची मागणी केली आहे. मराठवाड्यात क्लाऊड सीडिंग म्हणजेच कृत्रिम पावसाचा प्रयोग तातडीने राबवावा, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे.

धीरज देशमुख यांनी सोशल मीडियावरील पोस्टमधून सरकारचे लक्ष मराठवाड्यातील पावसाच्या परिस्थितीकडे वेधले. पावसाअभावी शेतकरी हवालदिल झाला असून अनेक ठिकाणी पिके वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने हवामानाचा वैज्ञानिक अभ्यास करून क्लाऊड सीडिंगचा पर्याय तपासावा, असे त्यांनी म्हटले आहे. मराठवाड्यातील दुष्काळसदृश परिस्थितीवर चिंता व्यक्त करताना आमदार धीरज देशमुख यांनी सांगितले की, मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांत पावसाने पाठ फिरवल्याने विहिरी, बोअरवेल आणि जलसाठे आटले असून शेतातील पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे बळीराजा अत्यंत हवालदिल झाला आहे.

## आम्ही ४ पिढ्यांपासून ओबीसी, कोणाच्या प्रमाणपत्राची गरज नाही; बबनराव तायवाडे यांचा लक्ष्मण हाकेंवर पलटवार

नागपूर दि.२ (प्रतिनिधी)- मी ओबीसी नाही, हे लक्ष्मण हाके यांनी कोणत्या आधारे म्हटले आहे, हे त्यांनी आधी स्पष्ट करावे. विदर्भातील लोक हे तब्बल चार पिढ्यांपासून ओबीसी आहेत, असे म्हणत राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी हाकेंवर निशाणा साधला आहे.

बबनराव तायवाडे म्हणाले की, कुणबी समाजाची नोंद काका कालेलकर आयोगाच्या यादीत स्पष्टपणे होती. त्यापूर्वी मंडल आयोगाने काढलेल्या नोंदींमध्येही ही सूत्रे होती. त्यानंतर २००४ मध्ये कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी या उपजातींचा यामध्ये अधिकृत समावेश करण्यात आला. जर हे पुरावे नसतील, तर मग नक्की कोण ओबीसी आहे हे हाके यांनीच सांगावे. आम्हाला आमच्या ओबीसी ओळखीसाठी कोणाच्याही प्रमाणपत्राची गरज नाही.

बबनराव तायवाडे म्हणाले की, आमच्याकडे पिढीजात ओबीसींचे प्रमाणपत्र आहे, म्हणूनच आम्ही ओबीसी हक्कांची चळवळ चालवत आहोत. याच आधारावर आम्ही महाराष्ट्रासह दिल्लीतही राष्ट्रीय स्तरावर काम करत आहोत. आम्ही कोणाचीही राजकीय विचारधारा घेऊन चालत नाही. ओबीसींच्या संविधानिक मागण्या मान्य करण्यासाठी सरकारला ५८ शासन निर्णय काढावे लागले.

बबनराव तायवाडे म्हणाले की, २०१६ पूर्वी ओबीसींची परिस्थिती काय होती आणि आज काय परिस्थिती आहे, याचा सर्वांनी विचार केला पाहिजे. २०१६ नंतर कोणत्या सोयी-सुविधा आणि सवलती मिळाल्या, हे आमच्याइतक्या हक्काने इतर कोणीही सांगू शकत नाही. हाके यांनी काहीही बोलावे, तो त्यांचा अधिकार आहे. त्यांनी माझ्यावर टीका केली असली तरी मी त्यांच्यावर आता काहीही बोलणार नाही. आम्ही त्यांच्या टीकेला उत्तर देणे आता बंद केले आहे.

## 'अमित ठाकरेंवर दोन तासांत गुन्हा दाखल होतो पण, अजित पवार प्रकरणात अद्याप गुन्हा दाखल नाही', सुप्रिया सुळे

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे छायाचित्र काढून टाकले म्हणून दोन तासांत अमित ठाकरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येतो. पण, दुसरीकडे माझे भाऊ अजित पवार यांच्या मृत्युप्रकरणी अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही, अशी टीका राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी सरकारवर केली. अजित पवार गेल्यानंतरही त्यांच्या पक्षाचे आमदार व खासदार सत्ता भोगत आहेत पण, त्यांच्या मृत्यूच्या चौकशीबाबत त्यापैकी एकही आमदार बोलत नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे या बुधवारी ठाण्यातील पक्ष कार्यालयात आल्या होत्या. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सरकार व अजित पवार गटावर केली. अजित पवार गट हा राज्यातील सत्तेत सहभागी आहे. याच सरकारमध्ये अजित पवार हे उपमुख्यमंत्री होते. पण, त्यांच्या पक्षातील आमदार-खासदारांनी माझ्या भावाच्या एफआयआर बद्दल एक शब्द काढलेला नाही. माझा भाऊ गेला पण, त्यानंतरही त्यांच्या पक्षाचे लोक सत्ता भोगत आहेत. याप्रकरणाचा (पान ४ वर)

## पाऊस पुन्हा सक्रिय होणार; तूट भरून निघण्याची शक्यता

मुंबई दि.२ (प्रतिनिधी)- राज्यातील पावसाच्या चिंतेंने व्याकूळ झालेल्या शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे, ऑगस्ट महिन्यात पाऊस थांबल्यामुळे बळीराजाची चिंता वाढली होती. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, पुढील २ ते ३ दिवसांत विदर्भ आणि त्याला लागून असलेल्या भागात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. ओडिशाहून पश्चिमेकडे सरकणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे आणि दक्षिण गुजरात ते उत्तर मध्य महाराष्ट्रादरम्यान तयार झालेल्या वाऱ्याच्या द्रोणीय रेषेमुळे २ सप्टेंबरच्या संध्याकाळपासून उत्तर मध्य महाराष्ट्रात पाऊस वाढेल. या हवामान बदलांमुळे ३ ते ५ सप्टेंबर दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रात चांगल्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

तर पुढील दोन दिवस विदर्भात खासकरून पूर्व विदर्भातील जिल्ह्यात मध्यम पावसाची शक्यता असल्याचे अंदाज प्रादेशिक हवामान विभागाच्या नागपूर केंद्राने व्यक्त केले आहे. हवामान विभागाने २ सप्टेंबर ते ४ सप्टेंबर या दरम्यान विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये मध्यम ते दमदार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. विशेषतः पूर्व विदर्भातील गोंदिया,भंडारा,चंद्रपूर गडचिरोली व नागपूरच्या काही भागात मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. त्यामुळे पूर्व विदर्भातील काही जिल्हात पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या जिल्ह्याना यलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, पूर्ण सप्टेंबर महिन्यात सामान्य पेक्षा कमी पावसाचा अंदाज देखील व्यक्त करण्यात आला आहे. ऑगस्टमध्ये निर्माण झालेली पावसाची मोठी तूट काही प्रमाणात भरून निघते का, याकडे आता लक्ष लागले आहे.

## उत्तर प्रदेश आणि बिहारला जोडणारा बुलेट ट्रेन प्रकल्प, १२ तासांचा प्रवास फक्त साडेचार तासात होणार

नवी दिल्ली दि.२ (वृत्तसंस्था)- नवीन बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी महत्वाची माहिती दिली आहे. उत्तर प्रदेश आणि बिहारला जोडणाऱ्या प्रस्तावित बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत त्यांनी माहिती दिली आहे. मुंबई-अहमदाबाद कॉरिडॉर पूर्ण झाल्यानंतर, देशाचा पुढील बुलेट ट्रेन कॉरिडॉर दिल्लीला आग्रा, कानपूर, लखनौ, वाराणसी आणि पाटणाशी जोडला जाणार असल्याचे ते म्हणाले. नेपाळगंज रोड-नानपारा-बहराइच विभागातील नव्याने बांधलेल्या आणि विद्युतीकृत ब्रॉडगेज रेल्वे मार्गाच्या उद्घाटन वैष्णव यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

राजधानी दिल्लीला उत्तर प्रदेश आणि बिहारशी जोडणारा हा पहिला हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर असेल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर, दिल्ली ते पाटणा प्रवासाचा वेळ काही तासांपर्यंत कमी होईल. प्रस्तावित हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरचे उद्दिष्ट दिल्ली आणि पाटणा दरम्यानचे अंदाजे ११७० (पान ४ वर)

## भारताने योग्य वेळी मदत केली, नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांच्याकडून संसदेत आभार

काठमांडू दि.२ (वृत्तसंस्था)- नेपाळमध्ये आलेल्या भीषण महापुरामुळे १,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून अजूनही हजारो लोक बेपत्ता आहेत. या नैसर्गिक आपत्तीनंतर भारत आणि चीनने केलेल्या मदतीबद्दल पंतप्रधान बालेन शाह यांनी दोन्ही देशांचे आभार व्यक्त केले आहेत. नेपाळच्या संसदेत बोलत असताना नेपाळने आंतरराष्ट्रीय मदतीला नकार दिला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. ज्यावेळी अशाप्रकारची आपत्ती कोसळले, तेव्हा मदत नाकारण्याचा प्रश्नच येत नाही.

बालेन शाह म्हणाले, आमचे मित्र राष्ट्र असलेल्या चीन आणि भारताने त्यांचे तंत्रज्ञ पाठवले. पहिल्या दिवसांपासून ते या समस्येवर लक्ष ठेवून होते. त्यांनी हवाई टेहळणी केली आणि नुकसानीचा आढावा घेतला. ज्या भागाला फटका बसला आहे, तिथे उतरणे शक्य आहे का? याची माहिती घेतली. बालेन शाह पुढे म्हणाले, भारतीय तंत्रज्ञ शक्य तितक्या लवकर दुर्गम भागात पोहोचले. ही एक अपवादात्मक परिस्थिती होती. पूर आलेल्या ठिकाणी चिखल आणि गाळ साचला होता. तिथे उत्खनन यंत्रणा पोहोचणे तर अवघड होतेच, शिवाय लष्कर आणि सशस्त्र पोलीस दलाच्या जवानांनाही उभे राहायला जागा नव्हती, असेही ते म्हणाले. नेपाळच्या महापुरात सुमारे १,१२७ लोकांचा मृत्यू झाला असून अद्यापही हजारो लोक बेपत्ता आहेत, त्यानंतर नेपाळच्या पंतप्रधानांचे हे विधान समोर आले आहे. नेपाळच्या सशस्त्र दलाने आतापर्यंत ६,५४१ लोकांना वाचवले असून ४,८५८ लोक अजूनही बेपत्ता असल्याचे सांगितले जाते. बालेन शाह यांनी यापूर्वी सांगितले की, मागच्या आठवड्यात भोटेकोशी नदीत आलेल्या पुराचे पाणी रसुआ जिल्ह्यात शिरले. ही आपत्ती हवामान बदलामुळे ओढवली असल्याचा आरोप त्यांनी केला. अशा घटना टाळण्यासाठी जागतिक आपत्ती प्रतिसादाची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

# एकही एकल महिला नावनोंदणीपासून वंचित राहू नये : शिल्पाताई परदेशी



वैजापूर, दि. २ (प्रतिनिधी) – शहरातील एकल महिला, परित्यक्ता महिला तसेच अविवाहित पात्र महिला यानी नगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागात ५ सप्टेंबरपर्यंत नावनोंदणी करून शासनाच्या नियोजित योजनेचा लाभ मिळवावा असे आवाहन बुधवार(ता.२)रोजी माजी नगराध्यक्षा शिल्पाताई दिनेशभाऊ परदेशी यांनी 'एकल महिला नाव नोंदणी' कार्यक्रमात केले.

त्या पुढे म्हणाल्या की, शहरातील एकही एकल महिला नाव नोंदणीपासून वंचित राहू नये, शहरातील नगरसेविका यांनी आपल्या प्रभागात एकल महिलांना नाव नोंदणी करण्यास आवाहन करावे, असेही त्या पुढे म्हणाल्या शहरात साडे पाचशे एकल महिलांची नाव नोंदणी झालेली आहे.

५ सप्टेंबरपर्यंत शासनाने मुदत वाढ दिलेली आहे, या प्रसंगी जेष्ठ नागरिक व समाज कार्यकर्ते ठा.धोंडिरामसिंह राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती,त्यांनीही जास्तीत जास्त महिलांनी नाव नोंदणी करून शासनाच्या नियोजित योजनेचा लाभ घेऊन स्वावलंबी बनावे असे उपस्थित महिला व नगरसेविका याना आवाहन केले. नगरपालिकेने शासनाकडून पांच सप्टेंबर पर्यंत मुदत वाढवून घेतलेली आहे.

प्रास्तविक प्रकल्प अधिकारी सुनील भाग्यवंत यांनी केले, या प्रसंगी नगरसेविका ज्योतीताई जोशी, शेख सुमैय्या सोहेल बक्ष,मोनाली गणेश खैरे, पूजा अविनाश त्रिभुवन, जयश्री सावन चौधरी, सविता शैलेश चव्हाण, सुरेखा सुरेश घाटे यांची उपस्थिती होती. श्रीमती काकडे यांनी सहभाग नोंदविला दिवाकर त्रिभुवन यांनी आभार मानले.

# १० मिनिटांचा निर्णय आणि १६४३ जीव वाचले नेपाळच्या एका शिक्षकाची धाडसी निर्णय

२७ ऑगस्ट २०२६, सकाळी ९:२०. नेपाळच्या त्रिशूली खोऱ्यातील त्रिभुवन त्रिशूली सेकंडरी स्कूलमध्ये नेहमीसारखी प्रार्थना सुरू होती. १६४३ मुलं वर्गात होती.त्याच वेळी प्रिन्सिपल राजेंद्र दवाडी यांच्या मोबाईलवर फोन आला. पलीकडच्या गावातला मित्र घाबरलेल्या आवाजात म्हणाला, गाव संपलं, नदी सगळं घेऊन गेली.

राजेंद्र, पळ हिमनदी कोसळून त्रिशूली नदीत ९ मीटर उंचीची महापुराची लाट तयार झाली होती. ती ताशी ८० किमी वेगाने खाली येत होती.शाळा नदीपासून ६० मीटर उंचीवर, मजबूत काँक्रिटची. कुणीही असतं तर थांबलं असतं. पण दवाडी सर थांबले नाहीत.काही मिनिटांतच एका पालकाने येऊन सांगितलं पाणी झपाट्याने वर येतंय. सरांनी क्षणाचाही विचार न करता शाळेची घंटा वाजवली. सर्व शिक्षकांना एकच सूचना मुलांना घ्या आणि डोंगरावर पळा.मुलांमध्ये एकच गोंधळ. एका मुलीला तर भीतीने चक्कर आली, तिला मोटारसायकलवरून वर नेलं. बाकी सगळे पायपीट करत वरच्या बोधीच्या झाडाखाली जमा झाले. दवाडी सर सगळ्यात शेवटी आणि १० मिनिटांतच जे व्हायचं होतं ते झालं. त्यांनी ज्या इमारतीत २० वर्षे शिकवलं, ती इमारत त्यांच्या डोळ्यांसमोर पुरात वाहून गेली. आज १६४३ मुलं जिवंत आहेत, कारण एका शिक्षकाने योग्यवेळी योग्य निर्णय घेतला. त्याने शंका घेतली नाही, उशीर केला नाही. जेव्हा अशी वेळ येते तेव्हा पदापेक्षा जबाबदारी मोठी असते. दवाडी सरांनी त्या दिवशी इंग्रजी नाही शिकवलं, तर माणुसकीचा सर्वात मोठा धडा शिकवला.

**– सुदाम भाऊसाहेब शिंदे**

# 'पवित्र' पोर्टलद्वारे शिक्षक पदभरती; आज (दि.३)पासून कागदपत्र पडताळणी

छत्रपती संभाजीनगर दि. २ (प्रतिनिधी) – आदिवासी विकास विभागाच्या अपर आयुक्त कार्यालय, अमरावती यांच्या अधिनस्त शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गातील ४६८ रिक्त पदांची भरती 'पवित्र' (PAVITRA) पोर्टलद्वारे राबविण्यात येत आहे. या भरती प्रक्रियेत शिफारसप्राप्त २९६ उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी गुरुवार दि. ३ ते शनिवार दि.५ सप्टेंबर दरम्यान करण्यात येणार आहे. आदिवासी विकास विभागाच्या संकेतस्थळावरही अमरावती विभागातील पवित्र पोर्टल शिक्षक भरती व शिफारसप्राप्त उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीची सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

कागदपत्रे व प्रमाणपत्रांची पडताळणी अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या कार्यालयात करण्यात येणार आहे. उमेदवारांनी त्यांच्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांक व वेळेनुसार पडताळणीस उपस्थित राहावे, असे आवाहन अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या कार्यालयाने केले आहे.

पदनिहाय व माध्यमनिहाय शिफारसप्राप्त उमेदवारांची यादी तसेच कागदपत्र पडताळणीचे सविस्तर वेळापत्रक आदिवासी विकास विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

संबंधित उमेदवारांनी संकेतस्थळावरील सूचना तपासून त्यानुसार आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे.

उमेदवारांनी पोर्टलवर नोंदविलेल्या माहितीनुसार आवश्यक स्वयंप्रमाणित शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेची मूळ प्रमाणपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भातील प्रमाणपत्रे, अधिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास), टीईटी/सीटीईटी प्रमाणपत्र, दिव्यांग प्रमाणपत्र तसेच अन्य आवश्यक कागदपत्रांच्या मूळ प्रती व प्रत्येकी एक स्वयंप्रमाणित छायांकित प्रत सोबत आणावी.

सर्व शिफारसप्राप्त उमेदवारांनी त्यांच्यासाठी निश्चित केलेल्या दिनांक व वेळेनुसार कागदपत्र पडताळणीस उपस्थित राहावे, असे आवाहन अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या कार्यालयाने केले आहे.


# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावरील ''लोकजागर'कार्यक्रमात धोंडीरामसिंह राजपूत मुलाखत



वैजापूर, दि. २ (प्रतिनिधी) – मराठवाड्याचे बालसाहित्यक ,लेखक ,कवी व समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांची आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावर 'लोकजागर' कार्यक्रमात नुकतीच त्यांच्या वर्ष १९६७ पासूनच्या सामाजिक,शैक्षणिक,साहित्यक व राष्ट्रीय कार्याची आढावा घेणारी मुलाखत प्रसारित झाली. आकाशवाणी निर्देशक एस. बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदिका अनुप्रिया भाले यांनी राजपूत यांची मुलाखत घेतली.राजपूत यांनी आपल्या ७६वर्षाच्या कारकिर्दीतील १९६७पासूनच्या सामाजिक कार्याचा लेखा -जोखा या कार्यक्रमात सादर केला,श्रीमती भाले यांनी त्यांना विविध प्रकारच्या सामाजिक कार्या

वर प्रश्न विचारून राजपूत यांच्या सामाजिक कार्याचा परिचय श्रोत्यांना करून दिला.राजपूत यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्धल महाराष्ट्र शासनाने त्यांना एकाच समयी अत्यंत मानाचे असलेले दोन पुरस्कार अनुक्रमे डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार व कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार देऊन सन्मानित केलेले आहे.राजपूत यांनी तळागाळातील दीन, दुबळे,गोर ,गरीब, आदिवासी याच्यासाठी सामाजिक बांधिलकी जपत अशा घटकाना शासकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने शासकीय जमिनी मिळवून देणे,मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळवून देणे,त्यांना शिष्यवृत्ती मिळवून देणे,बचत गट स्थापन करून महिलांना स्वावलंबी बनविणे,एकल महिलांना शासनाच्या नियोजित योजनेसाठी माहिती देणे,शेतकरी कुटुंबांना शासकीय मदत मिळवून देणे,वृक्षारोपण, स्वच्छता अभियान,पाणी अडवा ,पाणी जिरवा, साहित्य लेखन व वृत्तपत्रीय लेखन माध्यमातून समाजजागृती करणे ,सेवा निवृत्त फौजी जवान यांच्या पाठिशी खंबीर पणे उभे राहून त्यांना आरोग्य सेवा मिळवून देणे तसेच,कौटुंबिक आधार देणे ,देहदान व अवयव दान विषयी जनजागृती करणे,जेष्ठ नागरिकांच्या व्यथा दुर करणे,त्यांना सहकार्य ईत्यादी समाज कार्य करणे हे त्यांचे कार्य विचारात घेऊन आकाशवाणी संभाजीनगर यांनी त्यांना पाचारण करुन त्यांचे समाज कार्य समाजापर्यंत पोहचविले.

# रिलीज डेटची घोषणा! रश्मिका मंदानाची बहुप्रतिक्षित ॲक्शन ड्रामा 'मैसा' २७ नोव्हेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहात दाखल होणार!



**'मैसा'** हा भारतातील पहिल्या फीमेल-लेड पॅन-इंडिया चित्रपटांपैकी एक मानला जात आहे. या चित्रपटात रश्मिका मंदाना आजवरच्या सर्वात इंटेन्स अवतारात दिसणार आहे. निर्मात्यांनी आतापर्यंत शेअर केलेल्या चित्रपटातील विविध लूक पोस्टर्समधून तिची झलक पाहायला मिळाली असून, या झलकांना प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळत आहे. त्यामुळे चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे!

'मैसा' हळूहळू २०२६ मधील सर्वाधिक चर्चेत असलेल्या चित्रपटांपैकी एक बनत आहे. या चित्रपटात पॅन-इंडिया सेंसेशन रश्मिका मंदाना मुख्य भूमिकेत दिसणार आहे. आपल्या वैविध्यपूर्ण अभिनयासाठी, दमदार स्क्रीन प्रेझेन्ससाठी आणि प्रत्येक व्यक्तिरेखेला भावनिक खोली देण्याच्या क्षमतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या रश्मिकाने आपल्या अभिनयातून सातत्याने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. 'मैसा'च्या माध्यमातून अभिनेत्री एका बोल्ड आणि दमदार अवतारात दिसणार असून, तिचा हा अंदाज याआधी कधीही न पाहिलेल्या रूपात प्रेक्षकांसमोर येणार आहे. या भूमिकेमुळे तिच्या ऑन-स्क्रीन इमेजलाही एक नवा आयाम मिळण्याची शक्यता आहे.

चित्रपटाबद्दलचा उत्साह दिवसेंदिवस वाढत असताना आता 'मैसा'च्या रिलीज डेटचीही घोषणा करण्यात आली आहे. २७ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रदर्शित होणारा हा चित्रपट रश्मिकाला एका दमदार ॲक्शन अवतारात सादर करणार आहे. पहिल्यांदाच अशा प्रकारची इंटेन्स व्यक्तिरेखा साकारताना रश्मिका या चित्रपटाच्या माध्यमातून मोठ्या पॅन-इंडिया स्केलवर अशा शक्तिशाली भूमिकेत दिसणाऱ्या आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक ठरणार आहे. रश्मिकाने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर चित्रपटातील तिच्या व्यक्तिरेखेची एक इंटेन्स झलक शेअर करत रिलीज डेटची घोषणा केली. पोस्टच्या कॅप्शनमध्ये तिने लिहिले: अनफॉर्मुला फिल्म्सच्या निर्मितीत आणि रविंद्र पुल्ले यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेला 'मैसा' हा भावनिक ॲक्शन थ्रिलर आहे.

# भारतीय ज्ञानपरंपरेत आदिवासी समाजाचे योगदान : डॉ. प्रकाश गायकवाड




गंगापूर, दि. २ (प्रतिनिधी) – श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर येथील 'स्टाफ अकॅडमी' (ज्ञान-प्रबोधिनी) समितीच्या वतीने दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १.३० वाजता महाविद्यालयात ङ्गआदिवासी (जनजातीय) समाज की भारतीय ज्ञान परंपरा में भूमिका या विषयावर विशेष व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. प्रकाश सटवाजी गायकवाड उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विशाल साबणे होते. यावेळी पर्यवेक्षक डॉ. हरिभाऊ सातपुते, आयक्यूएसी समन्वयक डॉ. विवेकानंद जाधव तसेच 'स्टाफ अकॅडमी' (ज्ञान-प्रबोधिनी) समितीप्रमुख डॉ. विठ्ठल फुलारी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना डॉ. प्रकाश गायकवाड यांनी भारतीय ज्ञानपरंपरेच्या जडणघडणीत आदिवासी तथा जनजातीय समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन केले. आदिवासी समाजाने पिढ्यानपिढ्या अनुभव, निरीक्षण आणि मौखिक परंपरेच्या माध्यमातून जतन केलेले ज्ञान हे भारतीय संस्कृतीच्या समृद्ध परंपरेचा अविभाज्य भाग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आदिवासी समाजाचे निसर्गज्ञान, औषधी वनस्पतींचे पारंपरिक ज्ञान, जैवविविधतेचे संवर्धन, वनसंपत्तीचे व्यवस्थापन, जलव्यवस्थापन, लोककला, लोकसाहित्य आणि मौखिक ज्ञानपरंपरा यांचा त्यांनी विशेष उल्लेख केला. निसर्गाशी सुसंवाद साधून जगण्याची आदिवासी समाजाची जीवनपद्धती आजच्या पर्यावरणीय संकटाच्या काळात अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिशादर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

भारतीय ज्ञानपरंपरेचा अभ्यास करताना केवळ लिखित ग्रंथसंपदेपुरता मर्यादित दृष्टिकोन न ठेवता विविध समाजघटकांनी आपल्या अनुभवातून विकसित केलेल्या ज्ञानाचाही विचार करणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाच्या पारंपरिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण, संवर्धन आणि नव्या पिढीपर्यंत हस्तांतरण होणे ही काळाची गरज असल्याचेही डॉ. गायकवाड यांनी नमूद केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. विशाल साबणे यांनी भारतीय ज्ञानपरंपरेच्या व्यापकतेवर प्रकाश टाकत आदिवासी समाजाच्या पारंपरिक ज्ञानाचा शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास होणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. अशोक चव्हाण यांनी केले. 'स्टाफ अकॅडमी' (ज्ञान-प्रबोधिनी) समितीच्या वतीने आयोजित या व्याख्यानातून भारतीय ज्ञानपरंपरेतील आदिवासी समाजाचे योगदान, त्यांचे पारंपरिक ज्ञान, जीवनपद्धती आणि सांस्कृतिक वारसा याविषयी उपस्थितांना महत्त्वपूर्ण माहिती मिळाली.

# समृद्धीवर दरोडा; हद्दीचा वाद घालणाऱ्या दोघा पोलिसांची उचलबांगडी

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) – समृद्धी महामार्गावर भरदिवसा धाडसी दरोडा पडून संपूर्ण राज्य हादरले असतानाच, पोलिस प्रशासनाचा अत्यंत लाजीरवाणा आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे! दरोडेखोरांच्या तावडीतून सुटून थरथरत्या पायांनी पोलिसांकडे मदतीची याचना करायला गेलेल्या पीडित उद्योजकाला पोलिस कर्मचाऱ्यांनी मदतीऐवजी 'हद्दीचा वाद' सांगत चक्क तब्बल १० तास ठाण्या-ठाण्यात फिरवले!

या भयंकर हलगर्जीपणाची खाकी वर्दीवर प्रचंड टीका झाल्यानंतर अखेर पोलिस अधीक्षकांनी दोन पोलिसांची तडकाफडकी हकालपट्टी करत त्यांना मुख्यालयात जमा केले आहे.

**नेमका थरार कसा घडला?**

अहिल्यानगरमधील राहुरीचे २२ वर्षीय उद्योजक साहिल सोनवणे आपल्या मित्रांसह फॉर्च्युनर कारने देवदर्शन करून परतत होते.

२६ ऑगस्टला दुपारी ४ वाजता वैजापूरजवळील हडसपिंपळगाव टोलनाक्याजवळ ३ आलिशान गाड्यांमधून आलेल्या ८ ते १० दरोडेखोरांनी ३ ते ४ किलोमीटर पाठलाग करून त्यांची कार गाठली. महामार्गावरच गाडी अडवून सोनवणे यांना बेदम मारहाण करत गळ्यातील अडीच तोळ्यांची सोन्याची साखळी हिसकावून दरोडेखोर पसार झाले.

**१० तासांचा हायव्होल्टेज ड्रामा!**

लुटालूट झाल्यानंतर भयभीत झालेल्या सोनवणे आणि त्यांच्या मित्रांनी तातडीने पोलिसांकडे धाव घेतली. पण, शिर्डी, कोपरगाव, वैजापूर आणि वीरगाव पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी 'हे आमच्या हद्दीत येत नाही' असे सांगत पीडितांना एका ठाण्यातून दुसऱ्या ठाण्यात फिरवत ठेवले. खाकीच्या या संतापजनक कारभारामुळे १० तास पीडित रस्त्यावर भटकत होते! अखेर प्रकरण अंगाशी आल्याचे दिसताच वैजापूर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

**कारवाईचा बडगा :** तक्रार नोंदवण्यास टाळाटाळ करणारे वैजापूर ठाण्याचे सहायक उपनिरीक्षक सुनील खरात आणि वीरगाव ठाण्याचे हवालदार गुणवंत थोरात यांची पोलिस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी तडकाफडकी मुख्यालयात उचलबांगडी केली.

# आर्यनंदी कॉलनी, छत्रपती संभाजीनगर येथे आचार्य हेमसागरजी महाराज यांच्या मंगल सानिध्यात इंद्रध्वज विधानास सुरूवात

छत्रपती संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) – आर्यनंदी कॉलनी वेदाननगर येथे चातुर्मासासाठी सिद्धांत चक्रवर्ती आचार्य श्री हेमसागर जी महाराज विराजमान असून त्यांचे मंगल सानिध्य, प्रेरणा व मार्गदर्शनाखाली इंद्रध्वज विधानाच्या आयोजन दिनांक २ सप्टेंबर ते ९ सप्टेंबर दरम्यान करण्याचे ठरले आहे, अशी माहिती चातुर्मास मुख्य संयोजक संजय पापडीवाल यांनी दिली.

आचार्य हेमसागरजी महाराज यांच्या चातुर्मास संपन्न होत असून अनेक कार्यक्रमाचे आयोजन येथे होत आहे. परम पूज्य गणिनी प्रमुख आर्यिका श्री ज्ञानमती माताजी यांनी पन्नास वर्षांपूर्वी या विधानाची रचना केली आहे. या विधानाचे हे स्वर्णिम वर्ष म्हणून पूर्ण देशभरात विधानाचे नियोजन करून साजरे केले जात आहे.

या विधानामध्ये ४५८ अकृत्रिम जिनालयाची इन्द्रा द्वारे पूजन अर्चन करून प्रत्येक मंदिरावर ध्वजा चढवली जाते. अत्यंत सुंदर व अतिशय कारी हे विधान असून देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर यावर्षी या विधानाचे आयोजन होत आहे. यासाठी पाच पितळी पंचमेरू, ४५८ जिनालय, प्रत्येक मंदिरामध्ये प्रतिष्ठित मूर्ती त्यावर ध्वजा असे आयोजन असून हे सर्व साहित्य अयोध्या येथून येथे येत आहे.

हे विधान संगीतमय होणार असून या विधानाचे प्रतिष्ठाचार्य अकलंक जैन आहेत. या विधानाचे प्रमुख पात्र सौधर्म इन्द्र दिनेश सौ निता, केतन स्विटी, कुणाल निवेदिता सेठी परिवार, ईशान इंद्र पूनमचंद सौ जयश्री अग्रवाल यज्ञनायक इंद्र श्रीमती कुंकुमदेवी, संजय डॉक्टर अंजली, विजय माधुरी पापडीवाल परिवार, सानत इंद्र श्रेणिक सौ सुनिता, निखिल सोनल कासलीवाल, महेंद्र इन्द्र श्रीमती शकुंतलादेवी आनंद सौ क्षमा, गीत सेठी, एक दिवसीय कुबेर इन्द्र श्रीमती हेमलता देवी संतोष, सौ रानो सेठी आहेत. या विधानाचे ध्वजारोहण कर्ता व संपूर्ण विधानांमध्ये जलपान इंद्राची शुद्ध भोजन व महाप्रसादीचे दातार कांतादेवी मनीष श्रद्धा, मोहन कुमारजी सौ सुनिता, पदम पायल सोनी परिवार हे आहेत.

या विधाना अनेक सामान्य इंद्र असून आहेत ज्या मध्ये हुकुमचंदजी एवं सौ. ज्योतिजी चांदीवाल, संदेश कुमारजी, श्रीमान संजयजी व सौ. शीलाजी कासलीवाल,अमितजी एवं सौ. डॉलीजी, ध्रुवी, भूवी अजमेरा, राजेंद्रजी एवं सौ. संगीताजी सेठी, रविजी, नवीनकुमारजी, नीतिनकुमारजी, सौ. कल्पना बिनायके, राकेशजी, सौ. निशाजी, रोचित, सौ. प्रिंसी रौनक बड़जात्या, राहुलजी सौ. प्रियाजी शाह, कांतादेवी भरतजी सौ. पूजाजी ठोले, शांता, नीतिनजी सौ. अन्नुजी केतनजी सौ. सौम्याजी पाटनी, जितेंद्रजी सौ. मंजूषा अजमेरा, अजय सौ. अन्नुजी जैन, मोतीलालजी, राजेशजी सौ. वंदनाजी पाटनी, अरुणाजी, सुशिलजी सौ. शर्मीलीजी गंगवाल, पंकजजी सौ. निशीजी पहाड़े, कैलाशचंद सौ. तारादेवी, प्रशांतजी सौ. ज्योत, वैभवजी सौ. स्वर्णा बिनायके, संजयजी एवं सौ. सरिकाजी पहाड़े,चंपाबाई, अनुपजी सौ. मीनाजी पाटनी, शीतल सौ. प्रजक्ता, निधिश सौ. जैस्मिन पाटनी,प्रकाश सौ. कल्पना सेठी, शरद सौ. निर्मला जैन जालनापुरकर, महावीरजी एवं सौ. सविताजी जैन,सौ. सीमाभाभी एवं अनिलजी पाटनी, सौ. मिताली अमित माही , ओमी काला, महावीर सौ. मीना, पियुष एवं सौ. शीतल, निखिल सौ. क्रितिका सेठी, सुभाषचंद्र सौ. पुष्पलताजी बोहरा, श्री नितिन सौ. आरती बोहरा, श्री सचिन सौ. लीना, श्री अपूर्व सौ. आंचल बोहरा, नंदलालजी सौ. शकुंतलादेवी, नविन सौ. पुजा बोहरा, शैलेंद्रजी सौ. किरणजी सेठी, उमेश सौ. अशा चुडीवाल, संघवी सौ. संगीता संघवी, श्रीपाल, सुनील, शिरीष, रिशू, सिद्धांत, वेदांत, अविज्ञा पाटणी, कासलीवालजी सौ. उषाजी, मीना, विजया कासलीवाल, बबनलालजी सौ. मिनादेवी, लोकेश-सौ स्वीटी, आगम, सर्वार्थ गोधा, रविंद्रजी सौ. रोशनी सेठी सर्वांनी या विधानाचा लाभ घ्यावा, सहभाग घ्यावा असे आव्हान सकल दिगंबर जैन समाज व १००८ श्री चंद्रप्रभू खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर आर्यनंदी कॉलनी, वेदांत नगर समाज यांनी केले आहे.

# नांदेड-अकोला रेल्वे मार्गाची डीआरएम प्रदीप कामले यांच्याकडून पाहणी

नांदेड, दि. २ (प्रतिनिधी) – नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) प्रदीप कामले यांनी १ सप्टेंबर रोजी नांदेड ते अकोला दरम्यान रेल्वे मार्गाची सर्वंकष पाहणी केली. या पाहणीदरम्यान रेल्वे पायाभूत सुविधा, परिचालन व्यवस्था, प्रवासी सुविधा तसेच विविध ठिकाणी सुरू असलेल्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

डीआरएम कामले यांनी अकोला ते पूर्णा दरम्यान रिअर विंडो निरीक्षण करून रेल्वे मार्गावरील पायाभूत सुविधांची स्थिती तपासली. तसेच मार्गावरील परिचालनाशी संबंधित विविध बाबींची पाहणी करून आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

पूर्णा, हिंगोली आणि वाशिम रेल्वे स्थानकांवर अमृत स्टेशन योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांच्या प्रगतीचीही त्यांनी पाहणी केली. स्थानकांवरील प्रवाशांना आधुनिक व दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

याशिवाय बसमत, हिंगोली, वाशिम आणि शिवणी शिवापूर येथील रेल्वे स्थानकांवरील सुरू असलेल्या गुड्स शेडच्या कामांची पाहणी करण्यात आली. या कामांची प्रगती, बांधकामाची गुणवत्ता आणि निर्धारित वेळापत्रक यावर त्यांनी विशेष भर दिला. अकोला येथील क्रू लॉबी आणि रनिंग रूममधील सुविधांचीही डीआरएम कामले यांनी पाहणी केली. रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा, त्यांच्या कामकाजातील सोयी तसेच सुरक्षित आणि कार्यक्षम परिचालनासाठी आवश्यक बाबींचा त्यांनी आढावा घेतला. अकोला-अकोट विभागातील विविध व्यवस्थांची माहिती घेऊन अकोट रेल्वे स्थानकाचीही पाहणी करण्यात आली. स्थानकावरील प्रवासी सुविधांसह सुरू असलेल्या विकासकामांचा त्यांनी आढावा घेतला.

**विकासकामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश –** रेल्वेच्या विकासकामांमध्ये विलंब होऊ नये, तसेच कामांच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी विशेष दक्षता घ्यावी, असे निर्देश कामले यांनी दिले. परिचालन कार्यक्षमता वाढविण्यासोबतच प्रवासी आणि रेल्वे कर्मचाऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. अकोला येथील भेटीदरम्यान डीआरएम प्रदीप कामले यांनी अकोल्याचे खासदार अनूप धोत्रे यांची भेट घेतली. या भेटीत अकोला परिसराशी संबंधित विविध रेल्वे प्रश्न, सुविधा आणि विकासकामांबाबत चर्चा करण्यात आली. या पाहणीदरम्यान अभियांत्रिकी, परिचालन, वाणिज्य, सिग्नल व दूरसंचार, विद्युत, टीआरएसओ, सुरक्षा, संरक्षा आणि गतिशक्ती विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नांदेड विभागातील रेल्वे पायाभूत सुविधा अधिक सक्षम करणे, प्रवासी सुविधांमध्ये सुधारणा करणे आणि सुरक्षित, कार्यक्षम व विश्वासार्ह रेल्वे परिचालन सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने ही पाहणी महत्त्वपूर्ण ठरली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# पर्यटन क्षेत्राला नव्याने चालना देण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे-जिल्हाधिकारी विनय गौडा

## पर्यटन विभागाची आढावा बैठक



छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहर व जिल्ह्यातील पर्यटन क्षेत्राला नव्याने चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास, स्वच्छता, पर्यटनस्थळांची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी तसेच शाश्वत पर्यटन व्यवस्थापन यावर भर देणे आवश्यक आहे. यासाठी प्रशासन, पर्यटन क्षेत्राशी संबंधित विविध भागधारक आणि संबंधित सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे व समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले.

जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात पर्यटन आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम., सहआयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार, अतिरिक्त जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, पोलीस उपायुक्त पंकज अतूलकर, सहायक आयुक्त (नियोजन) सुनील सूर्यवंशी, पर्यटन संचालनालयाच्या प्रादेशिक कार्यालयाचे उपसंचालक विजय जाधव, महानगरपालिकेचे उपायुक्त अंकुश पांढरे, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे अधीक्षक पुरातत्त्वविद् अरुण मलिक, पर्यटन क्षेत्रातील हितधारक श्री. राम भोगले, छत्रपती संभाजीनगर प्रमोटर गिल्डचे अध्यक्ष जसवंत सिंग, हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष हरप्रीत सिंग यांच्यासह पर्यटन क्षेत्राशी संबंधित विविध भागधारक व प्रशासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी गौडा म्हणाले की, शाश्वत पर्यटन ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ऐतिहासिक व वारसास्थळांसह परिसरातील पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रशासनासोबत टॅक्सी, ऑटो, बसचालक, हॉटेल व्यावसायिक, विक्रेते, पर्यटन मार्गदर्शक आणि इतर संबंधित घटकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. पर्यटकांना सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून दिल्यास जिल्ह्यातील पर्यटनाला अधिक चालना मिळेल, असेही ते म्हणाले.

तसेच विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या निर्देशानुसार, 'अजिंठा-वेरूळ महोत्सव' दरवर्षी आयोजित करण्यासंदर्भात यावेळी वेरूळ येथे 'वेरूळ महोत्सव' आयोजित करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने आगामी तीन वर्षांतील महोत्सवांचे वेळापत्रक आतापासूनच निश्चित करण्याचे नियोजन असल्याची माहितीही जिल्हाधिकारी श्री.गौडा यांनी दिली.

बैठकीत पर्यटन संस्था, हॉटेल व्यावसायिक, प्रवास संस्था, सहली आयोजक तसेच इतर भागधारकांनी पर्यटन विकासासाठी विविध सूचना व मते मांडली. पर्यटन उपसंचालक विजय जाधव यांनी शासकीय विभाग आणि पर्यटन क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांनी परस्पर सहकार्य व समन्वय साधून पर्यटनवाढीसाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. बैठकीत जिल्ह्यातील पर्यटन विकास, पर्यटनस्थळांची व पर्यटकांच्या सुरक्षेची व्यवस्था, पायाभूत सुविधा, स्वच्छता तसेच पर्यटन व्यावसायिकांच्या विविध अडचणी सोडविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर वेरूळ-घृष्णेश्वर परिसरात मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविक व पर्यटकांसाठी आवश्यक सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनेही आढावा घेण्यात आला.

# दिशा समितीची ७ सप्टेंबर रोजी बैठक; केंद्र शासनाच्या योजनांचा खासदार संदिपान भूमरे घेणार आढावा

### प्रलंबित प्रकरणे व तक्रारी २५ सप्टेंबरपर्यंत खासदार कार्यालयात सादर करण्याचे नागरिकांना आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात केंद्र शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, प्रलंबित प्रकरणे तसेच लाभार्थ्यांच्या अडचणींचा आढावा घेण्यासाठी खासदार संदिपान भूमरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा समिती)ची बैठक ७ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीस जिल्ह्यातील सर्व मंत्री, आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष, दिशा समितीचे सचिव तथा जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, महानगरपालिका आयुक्त, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह जिल्ह्यातील विविध केंद्र शासनाच्या योजनांशी संबंधित सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी व विभागप्रमुख उपस्थित राहणार आहेत.

बैठकीत केंद्र शासनाच्या विविध कल्याणकारी व विकासात्मक योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे. योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे का, निधीचा योग्य विनियोग होत आहे का, लाभार्थ्यांची प्रकरणे कोणत्या कारणामुळे प्रलंबित आहेत, तसेच विविध योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी याबाबत संबंधित विभागांकडून माहिती घेण्यात येणार आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील नागरिक, शेतकरी बांधव आणि केंद्र शासनाच्या विविध योजनांचे लाभार्थी यांनी त्यांच्या प्रलंबित प्रकरणांबाबतच्या तक्रारी, अडचणी अथवा महत्त्वाच्या मागण्या खासदार कार्यालयाकडे सादर कराव्यात, असे आवाहन खासदार संदिपान भूमरे यांनी केले आहे.

नागरिकांनी आपल्या तक्रारी व प्रलंबित प्रकरणांची छायांकित प्रत तसेच आवश्यक कागदपत्रांसह दिनांक २५ सप्टेंबरपर्यंत खासदार कार्यालयात सादर करावी, अथवा sandipanbhumare@gmail.com या ई-मेल आयडी वर पाठवावे जेणेकरून संबंधित विषयांचा पाठपुरावा करून ते दिशा समितीच्या माध्यमातून संबंधित विभागाच्या निदर्शनास आणून देणे शक्य होईल. 'केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना वेळेत मिळणे आणि कोणतेही पात्र प्रकरण अनावश्यकपणे प्रलंबित राहू नये, यासाठी दिशा समितीच्या बैठकीत संबंधित विभागांकडून ठोस आढावा घेण्यात येईल.

नागरिक व शेतकरी बांधवांनी आपल्या प्रलंबित प्रकरणांची माहिती खासदार कार्यालयाकडे सादर करावी,' असे आवाहन खासदार संदिपान भूमरे यांनी केले आहे.

# गणेशोत्सव २०२६ : तातुरत्या मंडप, स्टेज, मूर्ती स्टॉल साठी परवानगीसाठी एक खिडकी सुरू

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सार्वजनिक गणेश मंडळे तसेच नागरिकांना आवाहन करण्यात येते की, सन २०२६ मधील गणेशोत्सवाच्या अनुषंगाने तात्पुरता मंडप / स्टेज उभारावयाचा असल्यास महानगरपालिकेची आवश्यक परवानगी घेणे बंधनकारक आहे.

तात्पुरत्या मंडप / स्टेज उभारणीच्या परवानगीसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया दिनांक ०२ सप्टेंबर २०२६ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील. मंडळे / नागरिकांनी अर्ज करण्यापूर्वी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली 'मार्गदर्शक तत्त्वे – २०२६' काळजीपूर्वक वाचून त्यानुसार परिपूर्ण अर्ज सादर करावा.

महत्त्वाच्या सूचना

१. मंडप / स्टेज उभारण्यासाठी संबंधित प्राधिकरणाची आवश्यक परवानगी घेणे आवश्यक आहे.

२. केवळ अर्ज दाखल केला आहे म्हणून परवानगी मिळाली असे समजू नये. परवानगी प्राप्त झाल्यानंतरच मंडप / स्टेज उभारणी करावी.

३. परवानगीशिवाय उभारलेला मंडप / स्टेज हटविण्यात येईल तसेच संबंधितांविरुद्ध नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४. मंडप / स्टेजमुळे रस्त्यावरील वाहतूक, पादचारी मार्ग किंवा नागरिकांच्या ये-जा करण्यास अडथळा निर्माण होणार नाही, याची संबंधित मंडळांनी दक्षता घ्यावी.

५. उत्सवाच्या कालावधीत परिसरातील नागरिकांना त्रास होणार नाही तसेच ध्वनीप्रदूषणासंबंधी नियमांचे पालन होईल, याची दक्षता घ्यावी.

६. गणेशोत्सव शांततेत, सुव्यवस्थित व सुरक्षित पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व गणेश मंडळे व नागरिकांनी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस सहकार्य करावे.

७. त्याच श्री गणेश मूर्ती विक्रीसाठी स्टॉल उभारण्यासाठी ही याच एक खिडकी मार्फत परवानगी दिली जाईल. परवानगी घेऊन च स्टॉल उभारणी करण्याची दक्षता घेण्यात यावी . त्यासाठी कोणत्याही प्रकारची वाहतूक अडथळा होणार नाही याची दक्षता संबधित स्टॉल धारक यांनी घ्यायची आहे

# डाक अदालत सोमवारी

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- टपाल विभागातील सेवांबद्दल असलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासंदर्भात सोमवार दि.७ रोजी डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर डाक विभागाच्या सेवांबाबत तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झाले नसेल अशा तक्रारींची दखल या डाक अदालत मध्ये घेतली जाते. तरी संबंधितांनी आपली डाक सेवेबाबतची तक्रार दि.४ पर्यंत प्रवर अधीक्षक, डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ यांच्या नावे दोन प्रतित पाठवावी. नंतर प्राप्त तक्रारींची दखल घेतली जाणार नाही, असे प्रवर अधीक्षक डाकघर छत्रपती संभाजीनगर विभाग यांनी कळविले आहे.

### *मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण*

# मतदाराच्या हक्काचे संरक्षण करा; सुनावणीची संधी द्या-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमात प्रारुप मतदार याद्यांच्या प्रसिद्धी पश्चात आता जुळवणी न झालेले, विसंगती वा तफावत असणाऱ्या मतदार तपशिलाबाबत संबंधित प्रत्येक मतदाराला सुनावणीची संधी द्या.त्यांच्या मतदान हक्काचे संरक्षण करा. कोणताही पात्र मतदार वगळला जाणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज दिले.




मतदार यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या पुढच्या म्हणजेच सुनावणीच्या टप्प्याबाबत मतदार नोंदणी अधिकारी, सहा. मतदार नोंदणी अधिकारी यांचे प्रशिक्षण आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडले. अपर आयुक्त मनपा रणजीत पाटील,उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी रुपेश सिनगारे, नम्रता चाटे, डॉ. निलेश अपार, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, नीलम बाफना, डॉ. व्यंकट राठोड, अरुण जऱ्हाड तसेच सर्व सहा. मतदार नोंदणी अधिकारी आदी उपस्थित होते.

डॉ. निलेश अपार यांनी साधन व्यक्ती म्हणून प्रशिक्षण दिले. त्यात प्रारुप मतदार यादी प्रसिद्धी नंतर राबवावयाच्या सुनावणी प्रक्रियेसंदर्भात आजच्या प्रशिक्षणात माहिती देण्यात आली.

निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रमानुसार, मतदार यादी तयार करण्यासाठी दि. १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी दावा करता येईल. तसेच मतदार यादीत समाविष्ट असलेल्या नावाबाबत अथवा नोंदीतील तपशीलाबाबत आक्षेप असल्यास दि. ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत विहित नमुन्यात दावा अथवा हरकत दाखल करता येईल.

मतदार यादीत नवीन नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना क्र. ६, मतदार यादीतील नावाच्या समावेशास हरकत घेण्यासाठी अथवा नाव वगळण्यासाठी नमुना क्र. ७, तर मतदार यादीतील नोंदींच्या तपशीलात दुरुस्ती, बदल अथवा अद्ययावत करण्यासाठी नमुना क्र. ८ मध्ये अर्ज करता येईल. हे दावे व हरकती संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे विहित पद्धतीने सादर करता येतील.प्राप्त दावे व हरकतींची यादी दर आठवड्याला संबंधित मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच दावे व हरकतींबाबतची माहिती संबंधित मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयात उपलब्ध राहणार आहे. नागरिकांना आपल्या दाव्याची अथवा हरकतीची स्थिती संबंधित निवडणूक कार्यालयाकडून तपासता येईल.

प्रारूप मतदार यादी प्रत्येक पात्र नागरिकाच्या मतदानाच्या अधिकाराच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. त्यामुळे नागरिकांनी मतदार यादीतील आपले नाव आणि अन्य तपशील तपासावेत. पात्र असूनही नाव समाविष्ट नसल्यास विहित कालावधीत दावा दाखल करावा. तसेच आक्षेपार्ह अथवा अपात्र नोंद आढळल्यास त्याबाबत हरकत नोंदवावी.

प्रारूप मतदार यादी संबंधित मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे पाहता येईल. तसेच भारत निवडणूक आयोगाच्या मतदार सेवा पोर्टल वरही मतदार यादीची पडताळणी करता येईल. मतदार नोंदणी व सहा. मतदार नोंदणी अधिकारी यांनी आक्षेप असलेल्या प्रत्येक मतदाराचे समाधान करुन त्यांची सुनावणी घ्यावी. त्यासाठीची सर्व विहीत प्रक्रिया पार पाडावी. सुनावणीची नोटीस बीएलओ मार्फत प्रत्येक मतदाराच्या घरी नेण्यात यावी.सुनावणीच्या वेळी मतदारांना सोबत आणाव्या लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती द्यावी, इ. सुचना प्रशिक्षणादरम्यान देण्यात आल्या.

# डॉ.जे.पी.नाईक आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर; डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून चार जणांचा गौरव होणार

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दोन प्राचार्य व कॅम्पसमधील दोन प्राध्यपकांना महाराष्ट्र राज्य शासनाचा डॉ.जे.पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या शनिवारी (दि.पाच) शिक्षक दिनी सदर पुरस्कारांचे पुण्यात वितरण करण्यात येणार आहे.

राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्यावतीने शिक्षण क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या प्राचार्य, शिक्षकांचा सदर पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षांतील पुरस्कारांची घोषणा बुधवारी (दि.दोन) शासन आदेशाद्वारे करण्यात आली. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री मा.ना.चंद्रकांत दादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समितीने या पुरस्कारांर्थीची निवड केली आहे. यामध्ये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ.गुलाब दत्तराव खेडकर यांची निवड करण्यात आली. तर प्राचार्य संवर्गातून कन्नड येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नानासाहेब भोसले यांचा समावेश आहे. डॉ.खेडकर हे गेल्या २० वर्षांपासून अध्यापन, संशोधन कार्य करीत असून 'आयक्युएसी'चे संचालक म्हणूनही ते कार्यरत आहेत. याच केंद्राने १०० कोटी रुपयांचा पीएम उषा मेरू प्रकल्पासाठी प्रस्ताव सादर केला होता. 'कोविड-१९'च्या काळात 'कोविड टेस्टिंग लॅब'च्या माध्यमातून त्यानी मोठे कार्य केले आहे. या काळात जवळपास १० लाख सॅम्पल तपासणी त्यांनी केली. पॉल हॉर्बर्ट सेंटर फॉर डीएनए बारकोडींग अँड बायोडायर्व्हसिटी या संशोधन संस्थेचे ते संस्थापक संचालक आहेत.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी संगणकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ.भारती वामनराव गवळी यांची निवड करण्यात आली. तर प्राचार्य संवर्गातून परतूरच्या लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भारत दत्तराव खंदारे यांचा समावेश आहे. डॉ.गवळी यांनी परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक म्हणूनही काम केले आहे. तसेच दिनदयाळ उपाध्याय कौशल्य केंद्राच्या संचालक म्हणूनही कार्यरत आहेत. तर डॉ.खंदारे हे अधिसभा, व्यवस्थापन परिषदेचे विद्यमान सदस्य असून नुकतेच त्यांना भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. येत्या शिक्षकदिनी पुणे येथे सावित्रीबाई फुले विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात सदर पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. या सर्व पुरस्कारार्थींना २५ हजार रुपये रोख आणि मानपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या चारही पुरस्कारार्थीचे मा.कुलगुरु डॉ. विजय फुलारी, प्रकुलगुरु डॉ.प्रवीण वक्ते, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांनी अभिनंदन केले आहे.

# सब पोस्ट ऑफिससाठी भाडेतत्त्वावर जागेची आवश्यकता; सोमवारपर्यंत प्रस्ताव मागविले

छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्टेशन सब पोस्ट ऑफिसच्या कामकाजासाठी रेल्वे स्टेशन परिसरात अंदाजे ३८७ चौरस फूट क्षेत्रफळाची सुस्थितीतील इमारतीची आवश्यकता आहे. त्यासाठी सुस्थितीतील इमारत पाच वर्षांच्या कालावधीसाठी भाडेतत्त्वावर घेणे प्रस्तावित आहे. इच्छुक इमारत मालकांनी आवश्यक कागदपत्रांसह दि. ७ पर्यंत लेखी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन वरिष्ठ डाक अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर विभाग यांनी केले आहे.इमारतीत स्वतंत्र स्वच्छतागृह, स्वतंत्र वीज मीटर तसेच पोस्ट ऑफिसच्या कामकाजासाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. इच्छुक इमारत मालकांनी प्रस्तावासोबत मालमत्ता पत्र अथवा ८-अ नमुना, मंजूर नकाशा, अद्ययावत मालमत्ता कर पावती तसेच अन्य संबंधित कागदपत्रे जोडावीत. संपूर्ण प्रस्ताव वरिष्ठ डाक अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर हेड पोस्ट ऑफिस बिल्डिंग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ या पत्त्यावर दि. ७ पर्यंत सादर करावा, असे डाक विभागाने कळविले आहे.

# भटके विमुक्तीसाठी गोपीनाथ मुंडे यांचे योगदान; पद्मश्री भिकू इदाते यांचे प्रतिपादन



छत्रपती संभाजीनगर दि.२ (प्रतिनिधी)- भटके विमुक्त समाज ही एकेकाळी देशातील राज्यकर्ती जमात होती. मात्र कालौघात समाज मागे पडला. या समाजाच्या प्रगतीसाठी व मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गोपीनाथ मुंडे यांनी मोठे योगदान दिले, असे प्रतिपादन राष्ट्रीय भटके विमुक्त जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष पद्मश्री भिकू रामजी इदाते यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्थेच्या वतीने (जीएमएनआरडी) भटके विमुक्त दिनानिमित्त विशेष व्याख्यान मंगळवारी घेण्यात आले. प्रकुलगुरू डॉ प्रवीण वक्ते अध्यक्षस्थानी होते. यावेळी डॉ. संजय पुरी, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.व्यंकटेश लांब, संचालक डॉ संग्राम गुंजाळ, अधिसभा सदस्य ॲड.अरविंद केंद्रे, ॲड. संतोष केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. 'ग्रामीण विकासासाठी भटक्या विमुक्तांचे योगदान' या विषयावर प्रमुख वक्ते पद्मश्री भिकू रामजी इदाते (माजी अध्यक्ष राष्ट्रीय विमुक्त भटके आणि अर्ध- भटके जमाती आयोग) हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या व्याख्यानात भटक्या व विमुक्त समाज दिन का व कश्या साठी साजरा करायचा. ज्या समाजांना आज गुन्हेगार समजल्या जाते ते एकेकाळी या देशातील राज्यकर्ते होते. या संदर्भात उपस्थिताना ऐतिहासिक दाखले दिले. पारधी समाज, वडार समाज अशा सर्व भटक्या,मागास समाजातील दयनिय अवस्थेचे विदारक चित्र सर्वांसमोर मांडले. भटके व विमुक्त समाजाच्या उद्धारासाठी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी केलेल्या कार्याचा गौरव देखील त्यांनी आपल्या व्याख्यानात केला . दुसरे वक्ते डॉ. संजय पुरी यांनी आदिवासी व भटक्या समाजाच्या समस्या जसे मुलांचा आहार, आधार कार्ड व या समाजांना लागणारे इतर कागदपत्रे उपलब्ध करून देण्यामध्ये भटके विमुक्त विकास परिषदेतर्फे केल्या गेलेल्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रा.व्यंकटेश लांब यांनी १९५२ च्या पारधी समाजाच्या साठीचे कायदे आणि सामाजिक ऐतिहासिक प्रथा यावर भाष्य केले. प्र-कुलगुरु प्रा. प्रवीण वक्ते सर यांनी अध्यक्षीय समारोप केला, त्यांनी पद्मश्री दादा इदाते यांच्यामार्फत जोपासले गेलेल्या पारंपरिक कलांचा उल्लेख केला, भटक्या विमुक्त समाजात कौशल्य आधारित शिक्षण आधीपासूनच रुजलेले असल्याचे प्रतिपादन केले.

# पत्रकारितेचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी गाव व ग्रामीण भाग समजून घ्यावा-माहिती संचालक डॉ. गणेश मुळे

अमरावती दि.२ (प्रतिनिधी)- पत्रकारितेत बातमी, फिचर,लेख, संपादन आदी बाबी अधिक चांगल्या आत्मसात करण्यासाठी विद्यार्थ्यांनी गाव व तेथील संस्कृती, समाजकारण अशा सर्व बाबी समजून ग्रामीण भागाचा अभ्यास करावा, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाच्या नागपूर-अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी आज येथे केले.




येथील भारतीय जनसंचार संस्थेत (आयआयएमसी) डॉ.मुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी ते बोलत होते. आयआयएमसीचे क्षेत्रिय संचालक डॉ. राजेशसिंह कुशवाह, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार, माहिती अधिकारी रितेश भुयार, आयआयएमसीचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. विनोद निताळे, शैक्षणिक सहशिक्षण सहयोगी जयंत सोनोने आणि रोहण तायडे यावेळी उपस्थित होते.

संचालक डॉ. मुळे म्हणाले, गाव हा देश व विकासाचा केंद्र बिंदू आहे. त्यामुळे गावाचा परिसर तेथील संस्कृती, समस्या, पर्यावरण त्याला जोडून तेथील समाजकारण आणि राजकारण अशा सर्व बाबी पत्रकारितेचे शिक्षण घेतानाच विद्यार्थ्यांनी समजून घेतल्या पाहिजे. गाव व ग्रामीण भागाचा चांगला अभ्यास केल्यानंतर तालुका, जिल्हा, राज्य आणि देश समजू शकतो व पत्रकारितेतील बातमी, फिचर, लेख, संपादन आदी विषय समजू शकतात. वाचन, मनन आणि चिंतनाच्या त्रिसुत्रीचे महत्वही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. प्रभावी शासकीय जनसंपर्क, त्याची विविध साधने आणि बदलत्या काळातील जनसंपर्क त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून समजावून सांगितला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची त्यांनी सौदाहरण उत्तरे दिली.

तत्पूर्वी, इंग्रजी पत्रकारिता पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'द पब्लिक एँगल'या प्रायोगिक वृत्तपत्राचे डॉ.मुळे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. डॉ. मुळे आज अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी जिल्हा माहिती कार्यालयाला भेट दिली. त्यानंतर जिल्हा मराठी पत्रकार संघ, श्रमीक पत्रकार संघाला भेट देवून त्यांनी पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली.

(पान १ वरुन)

## मराठा समाजासाठी आजपासूनच..

सलाईन लावणे सुरू राहील, पण उपोषण पूर्णपणे सुटणार नाही आणि प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही, असे त्यांनी सांगितले. जर लोकांनी स्वतः अर्ज केले नाहीत तर त्यात तुमचा किंवा आमचा दोष नाही, असेही त्यांनी सांगितले.

भाजप आमदार प्रसाद लाड यांनी अंतरवाली सराटी येथे प्रत्यक्ष भेट घेऊन प्रस्ताव जरांगेंसमोर मांडला. मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे सर्व सवलती देणे, कुणबी प्रमाणपत्र वाटपास गती देणे, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे आणि आर्थिक महामंडळाच्या परताव्याची पूर्तता करणे यांसारख्या प्रमुख तरतुदींचा या मसुद्यात समावेश आहे.

## 'अमित ठाकरेंवर दोन तासांत...

तपास नेमका कुठे सुरू आहे, त्याची स्थिती काय आहे, हेच आम्हाला माहिती नाही.

महाराष्ट्रात प्रवास करताना रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यांत रस्ता आहे, हे कळत नाही. तसेच हे आता नवे राहिलेले नाही. याची सवयच झाली आहे. कोल्हापुरातही शेतकरी शक्तीपीठ प्रकल्प नको, असे सांगत आहेत, तरीही तो प्रकल्प लादला जात असल्याचे त्या म्हणाल्या.

## उत्तर प्रदेश आणि बिहारला...

किलोमीटरचे अंतर केवळ ४.५ तासांत पार करणे शक्य होणार आहे. सध्या, रेल्वेने हे अंतर पार करण्यासाठी अंदाजे १२ तास लागतात. प्रस्तावित कॉरिडॉरचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रवासाच्या वेळेत लक्षणीय घट होणार आहे.

११७० किलोमीटरचा दिल्ली-पाटणा प्रवास अंदाजे ४.५ तासांत पूर्ण होण्याचा अंदाज आहे, ज्यामुळे सध्याच्या रेल्वे प्रवासाच्या तुलनेत अंदाजे ७.५ तासांची बचत होईल. त्याचप्रमाणे, दिल्ली ते लखनौ प्रवासालाही अंदाजे २ तास आणि १२ मिनिटे लागण्याची अपेक्षा आहे. या हाय-स्पीड रेल्वेच्या शुभारंभाने, दिल्ली आणि उत्तर प्रदेशातील अनेक प्रमुख शहरांमधील प्रवास लक्षणीयरीत्या वेगवान होईल.